(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# भारतातील नव सामाजिक चळवळी — शेतकरी चळवळ

**श्री. अक्षय अरूण बच्छाव**

मु. पो. भाडणे, ता साक्री, जि धुळे, पिन ४२४३०४. ईमेल abachhav263@gmail.com

.....................................................................................

**प्रस्तावना**

भारतीय शेतकरी हा कर्जातच जन्मतो आणि कर्जातच मरतो. भारतात नेहमी पडणारे दुष्काळ तसेच लहरी पावसाळा यावार अवलंबुन असणारी शेती, ह्या शेतकऱ्यांपुढे चरितार्थाच्या अडचणी उभ्या राहतात. ''शेतकऱ्याच्या अडचणी जशाजशावाढत जातात तसातसा तो कर्जबाजारी होतो. त्यातुन त्याच्या अडचणी आणखी वाढत जात अशा रितीणे तो अशा चक्रव्युहात सापडतो की त्यातुन बाहेर पडण्याचा मार्गच शिल्लक राहत नाही आणि मग तो या दृष्टचक्रात पार बुडून जातो. त्याची जमीन त्याच्याकडून हिसकावून घेतली जाते. स्वातंपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतात अनेक राजकीय आणि सामाजिक चळवळी झाल्या. महाराष्ट्रातही अशा प्राकरच्या चळवळी झाल्या. महाराष्ट्राला तर अशा चळवळींचीही श्रेष्ट परंपरा आहे. या परंपरेनुसार स्वातंत्र्योत्तर काळात समाजपरिवर्तनाच्या अनेक चळवळी येथे उद्याला आल्या. पण शेतकरीचळवळी बाबतीत इतिहासात आपण कितीही मागे जाऊन बघितले तरी कोण्त्याही कालखंडात भारतीय शेतकरी त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द कंबर कसुन लढत होता, अशा पाऊलखुणा कुढेही आढळत नाहीत. अगदी शेताच्या बांधावर राजसैन्याच्या लढाया व्हायच्या तेव्हाही शेतकरी त्या लढायांकडे मुक—बधिरतेने निर्विकार चेहरा करूनच बत राहायचा. शेतकऱ्याला पक्के ठाऊक होते की, राजे असो, पेशवे असो, मोगल असो किंवा डाकु—लुटेरे असो, हे सारे विजयानंतर आपल्याकडे शेतसारा वसुल करायला किंवा धान्याची लुट करायलाच येणार आहेत. ह्या लढाया म्हणजे शेतसारा वसुल कोणी करायचा याचा रीतसर परवाना मिळवाण्यासाठीच असतात. ज्याला आपले म्हणावे असे यांच्यापैकी आपलेकोणी नाहीत. अशीच शेतकरी समाजातील सामुहिक विचारांची ठेवण असल्याने कितीही अन्याय, अत्याचार झालेत तरी त्याविरूध एक शेतकरी म्हणून शेतीच्या प्रश्न सोडवण्यासाठी एक ही शेतकरी पेटुन उढलान नाही, त्याने राजसत्तेविरूध बंड पुकारले असे उदाहरण शेतीच्या इतिहासात सापडत नाही. त्याऐवजी हात जोडुन आदराने उभा राहणारा शेतकरी मात्र इतिहासाच्या पानापानावर आपल्यास पाहायला मिळतो.

**समाजिक चळवळीचा अर्थ:**

समाजिक चळवळ कशाला म्हणावे या बाबतीत समाजशास्त्रीय विचारवंतामध्ये मतभेद आहेत. या हेतुने ''सर्वसाधारण पणे समााजव्यवस्थेत किमान परिवर्तनासाठी अनेक लोक एकत्र येवून संघटीतपणे प्रयत्न करतात. त्या प्रयत्नांना सामाजिक चळवळ संबोधले जाते''. समाज घटकांच्या सामुदायिक कृतींच्या स्वरूपात जेव्हा संप, मोर्चे, सभा, मिरवणुका आशा कृती होऊ लागतात तेव्हा सामाजिक चळवळीचे खरे रूप समोर येते.

**सामाजिक चळवळीची व्याख्या:**

१) **ईबर्ट ब्लुमार** : 'रूढ सामाजिक संबधांमधील एखाद्या क्षेत्रात परिर्वतन आपण्यासाठी करण्यात येणारे सांघिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय मोठ्या प्रमाणातील लोक सहभाग हे चळवळीचे वैशिष्ट्य असते'.

२) **लुन्दर्ग स्टीफन** : 'एक मोठ्या समाजातील अभिवृत्ती आणि सामाजिक संबंधामध्ये परिर्वतन करण्याकरीता एकत्रित प्रयत्न करणाऱ्या लोकांची समिती म्हणजेच सामाजिक चळवळ होय'.

३) **जे. आर. गसफिल्ड** : 'प्रस्थापित समाजरचनेत बदल घडवून आणण्यासाठी करण्यात येणाऱ्या सामुदायिक मागण्या हे सामाजिक जळवळीचे स्वरूप असते'.

**संशोधन पध्दती** : प्रस्तुत संशोधन पध्दतीत दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**गृहीतके :**

१) शेतकरी चळवळीतुन निर्माण झालेली आर्थिक दरी.

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

२) शेतकरी चळवळीतुन निमोण झालेला राजकीय गट.
३) शेतकरी चळवळीत असलेल्या नेतृत्वाचे राजकीय हितसंबंध.

**उद्दीष्टे :**

१) शेतकरी चळवळीचे प्रशन अभ्यासुन समजुन घेणे.
२) शेतकरी चळवळीचे स्थित्यंतराचा अभ्यास करणे.
३) शेतकरी संघटनांचा उदयांचा अभ्यास करणे.
४) शेतकरी चळवळी संदर्भात विविध राजकीय पक्षांचा दृष्टीकोण अभ्यासणे.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. आजही देशातील ६५ टक्के लोकसंख्येचा उदनिरर्वाह शेती व्यवसायावर अवलंबून आहे. याचा अर्थ शेती हा देशातील प्रमुख व्यवसाय असुन त्यावर आधारित इतर पूरक व्यवसाय मोठ्या प्रमाणावर आहे. स्वातंत्र्यापासुन या व्यवसायाकडे सरकारचे दुर्लक्ष झालेले आहे. परिणामी शेतीशी संबंधित असलेल्या समाज सतत दुर्लक्षित राहीला आणि त्याला असंख्य प्रश्नांनी वेढले असे असुनही तष्कालीन केंद्र व राज्य सरकारने समतावादी समाजनिर्मिती व शोषमुक्त समाजासाठी शेतीच्या मालकीवर नियंत्रण, शेतजमिनीचे पुनर्वाटण करणे यासाठी जमीन सुधारणा कायदा, कूळ कायदा, कमाल जमीन धारण कायदा यांसारखे कायदे करण्याचा प्रयत्न केला. याशिवाय केंद्र सरकार व राज्य सरकारची आर्थिक धोरणे ही शेतीप्रधान अर्थव्यवस्था असल्याने शेती उत्पादनाशी संबंधित असतात या सर्व पार्श्वभुमीवर शेतकऱ्यांच्या समस्येत भरच पडलेली दिसते.

**१) शेतकरी चळवळीला व्यापकतेचा अभाव.**

शेतकरी चळवळीला व्यापकता मिळाली नाही. भारतात कोणत्याही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर व्यापकता आली नाही. व्यापकता न येण्याचे कारण, जो तो आपला प्रश्न आपल्या प्रदेशात आपल्या प्रमाणेच सोडवत होते. राष्ट्रीय स्तरावर या चळवळीला पाठींबा मिळाला नाही. प्रदेशा पुरतेच मर्यादीत अशी चळवळ झाली त्यात कोणत्याही व्यापक आंदोलने स्वातंत्रउत्तर काळात झाले नाहीत हा ही त्यामागचा एक दुवा आहे.

**२) शेतकरी चळवळीकडे राजकीय पक्षांची पाठ.**

शेतकरी चळवळीला कोणत्याही राजकीय पक्षांचा पाठींबा मिळालाच नाही. शेतकरी चळवळ ही राजकारणांच्या दृष्टीस आलीच नाही. शेतकरीच्या बाजुने कोणीही स्पष्ट भुमिका घेण्यास पुढे आले नाही कारण भांडवलशाही, कारखानदारी यांना मिळणारा प्रतीसाद व पैसा यामुळे ते कोणतयाही राजकीय पक्षांनी शेतकरी चळवळीची पाठराखन न केल्याचे आपणास दिसते. शेतकरीचे प्रश्न घेऊन लढण्यांत रस दाखवला नाही. राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांच्या विरूध्दच बाजु घेतांना आपणास दिसते, कारण भांडवलदार, कारखानदार यांचा चांगलाच जवळचा संबंध होता. यामुळे शेतकऱ्याला भ्रमात टाकुन ते शेतकऱ्यांची बाजु मांडत आहेत असे दाखवत आले आहेत.

**३) अल्पभुधारक शेतकऱ्यावर झालेला अन्याय.**

शेतकरी चळवळीमुळे मोठ्या (बागायदार) शेतकऱ्यांनाच फायदा पोहचाला आहे. सामान्य शेतकरी व अल्पभुधारक शेतकरी यात मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊनही त्यांना एका बाजुला सारलेगेल्याचे चित्र दिसते, प्रत्यक्षात फायदा झाला सधन शेतकऱ्यांचा. सरकारी योजनां, अनुदाने, कर्जमाफी यांना आशा अनेक योजनांचा फायदा फक्त सधन शेतकऱ्यांनाच झाला. शेतकरी चळवळीला अल्पभुधारक व सामान्यातील सामान्य आश्या शेतकऱ्यांचाच पाठींबा होता. पण, त्यांच्या पदरात काहीच आले नाही. जमीनीच अल्पप्रमाण, सावकारी कर्ज, दुष्काळ एक ना अनेक समस्या भेडसावत होत्या त्यामुळे खरा शेतकरी, ज्या कडे काहीच नाही अशाच उपेक्षित असल्याचे आपल्यास वर्तमान परिस्थितीत चित्र दिसत आहे. यामुळे सर्वसामान्य शेतकरी वर्ग चळवळीपासुन दुरवण्याचे कारण त्यांच्या हिताकडे दुलर्क्ष. दुलर्क्षामुळे त्यांनी चळवळी पासुन लांबच राहण्यात योग्य आहे असे समाधान मनले. त्यामुळे हा शेतकरीवर्ग चळवळीपासुन लांब गेला.

**४) शेतकरी चळवळीच्या नेतृत्वाची राजकीय लालसा.**

शेतकरी चळवळीच्या प्रदेशीक राजकीय लालसेपाई शेतकरी चळवळीत फुट पडत राहील्या. या राजकीय लालसेपाई शेतकरी चळवळी मध्ये मोठ्या नुतृत्वाने जे निर्णय घेतले त्यात शेतकऱ्यांचे हिताचे निर्णय न घेता, आपला स्वार्थ कसा साधला जाईल या यावर लक्ष असल्याने गटबाजी वाढली. या गटबाजीच लवकरच रूपांतर पक्ष बांधनीला कसे कामीयेतील या कडे राजकीय पक्षांचे लक्ष होते. आपआपल्या हितसंबंधी नेतृत्वाला जवळ सारून आपले हितसाध्य करूण घेतांना दिसते. शेतकरी चळवळीचा केंद्रबिंदु याने मागे पडलेले आपणास जाणवतो. यातच शेतकरी चळवळ गटातटाच्या राजकारणात स्वत: ला ओढून घेतले आहे.

**५) शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुलर्क्ष.**

शेतकऱ्यांच्या मागण्या सामान्य होत्या. त्यांना आपल्या पिकाला हमीभाव हवा होता, जो शेतकरी पीक घेतो तो त्याच्या मालाचे मुल्यच ठरऊ शकत नाही. पीकाचा मालक त्याच्या पिकाचे मुल्य हे स्वत: ठरऊ शकत नव्हता. जो पिकवतो तोज त्याचा मालक पण दलाल त्याचा सारा नफा घेऊन जाता. त्याला आपल्या मेहनतीच फळपण मिळत नाही. यातुन आत्महत्या या एका पर्यायाला तो कवटाळतो. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडेच दुलर्क्ष झाल्याचे आत्महत्या वाढल्या आहे. शेतकरी आपल्या प्रश्नांना वाच्या फोडण्यात असमर्थ राहीला. पण त्याला आपल्या चळवळीच्या मध्यमातुन या प्रश्ना कडे कोणाचे लक्ष अकर्षीत करता ओले नाही.

**६) चळवळीचे फलीत**.

चळवळीचे फलीत येवढेच की राजकीय फायद्याचे पद चळवळीच्या नेतृत्वाच्या झोळीत पडतगेले. शेतकरी आपल्या नेतृत्वाला संसदेत निवडुन देत आहे. पण, नेतृवाला विसर पडला आहे. की, आपण चळवळीचे वारसदार आहोत आपल्याला संसदेत आपल हक्का साठी लढा द्यावयाचा आहे. आपले मागण्या, आपले प्रश्न या सर्वांचाच त्याला विसर पडला व सामन्य शेतकऱ्यांनी त्याला जे लोकप्रतीनीधीत्व दिले त्याचा तो स्वर्थासाठी उपयोग करून घेतांना शेतकऱ्यांना दिसले.

**७) अप्रभावी दबावगटाची भुमिका.**

शेतकरी चळवळीच्या माध्यमातुन सरकारवर जो प्रभावी दबावगट आपली बाजु मांडतो. त्या तुन त्या हव्या असलेल्या मागण्या तो सरकारवर दबाव टाकुन मान्य करून घेतो. पण, शेतकरी चळवळीच्या बाबतीत असे काही झालेले आपल्यास दिसत नाही. शेतकरी प्रभावी दबावगटाच्या भुमिकेत कधीच दिसली नाही. सरकार हवातसा शेतकरी चळवळीचा उपयोग करून घेतांना आपणास दिसते. अप्रभावी दबावगटामुळे शेतकऱ्यांचे हीत साध्य करता आले नाही.

**उपाययोजना :**

शेतकऱ्यांना आपण ५ वर्ष मुदतीचे, बिनतारण, बिनव्याजाचे कर्ज उपलब्ध करून देऊशकतो. याने त्याच्या कर्ज बाजारी पणाला आळा बसेल. शेतकऱ्या शेतकऱ्यांमधील जी आर्थिक दरी आहे तीला कमी करण्यासाठी २ एकर आतील शेतकऱ्यांना, कोरढवाहु शेतकऱ्यांना चांगल्या सोई उपलब्धकरून सधन शेतकरी व अल्पभुधारक यांच्यातली दरी कमीकरू शकतो. दुष्काळामुळे शेतीचे आर्थिक नुकसान जास्त होते. कोरड्या दुष्काळावर मात करण्यासाठी पाण्याच्या नियोजनाच्या कार्यशाळा घेऊन कमीत कमी पाण्यात शेती कशी करता येईल, या कडे लक्ष देऊन शेतकऱ्यांचा सहभाग वाढऊ शकतो.

**निष्कर्ष :**

शेतकरी चळवळी आपल्या साध्यपर्यंत पोहचु शकली नाहीत. शेतकऱ्याचे प्रश्न तसेच माघे पडत गेलीत, मालाला हमीभाव, स्वस्त दराचे कर्ज, सावकारपासुन सुटका, निसर्गाचा कोप या सर्वच प्रश्नांकडे शेतकरी चळवळीचे लक्षच राहीले नाही. मार्ग भटकलेल्या पक्षा प्रमाणे भटकत राहीलीली आपणास दिसते.

शेतकरी आपल्या त्याच प्रश्नांना घेऊन आजही तसाच जगत आला आहे. यापुढे पण तसाच जगत राहील या कारण एक सरकारची या वर्गा कडे फिरवलेली पाठ. जो वर शेतकरी आपल्या हक्का साठी लढत नाही तोवर हे असेच चालु राहील. त्याला हालउपेक्षा सहन कारवीच लागेल त्याची वाच्या फोडण्यासाठी स्वत:ला खंबीर करूण लढला पाहीजे. आपले दु:ख विसरूण संघर्ष करून, आपल्या मागण्या मान्य करून घ्याव्यात येवढाच मार्ग त्या समोर आहे.

**संदर्भ**

**मराठी**

१) जोशी शरद, 'शेतकरी संघटना—विचार आणि कार्यपध्दती', 'शेतकरी प्रकाश', अलिबाग, १९८८.

२) पकळकर विजय, 'योध्दा शेतकरी', 'राजहंस प्रकाशन', पुणे.

३) व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, 'महाराष्ट्रातील सत्तांतर', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९६.

४) बिपन चंद्र आणि इतर, 'इंडिया आफटर इंडिपेंडन्स'.

## English

1) Dhanagar D. N., 'Shetkari Sanghatana: The Farmers Movement in Maharashtra-Background and Ideology, Social Action', Oct-Des-1990.

2) Dhanagare D. N., 'Polulism and Power-Farmers movement in western India. 1980-2014, Routledge, India.